गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद
उर्ध्व पेनगंगा प्रकल्प मंडळ नांदेड
सिंचन भवन, नांदेड, 431605 (महाराष्ट्र)
दूरध्वनी क्र.(02462) कार्यालय 260977, फॅक्स 261675,
ई मेल- seuppc.nandedwrd@maharashtra.gov.in

CERTIFICATION INTERNATIONAL ISO 9001:2008 CIP/4883/13/08/841
JAB ACCREDITED QMS Certification Body Accreditation No: MSA-001

'जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळास कृपया भेट द्या. 'https://wrd.maharashtra.gov.in'

# सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांच्या कंत्राटी पध्दतीवर नेमणूक करण्याबाबत

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2715/प्र.क्र.100/ 11मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक मंत्रालय मुंबई 400032 दि.08/01/2016 अनुसार खालील संवर्गातील फक्त जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांना कंत्राटी पध्दतीवर या मंडळांतर्गत कार्यरत असलेले नांदेड , हिंगोली व यवतमाळ जिल्हयातील अधिनस्थ कार्यालयामध्ये बांधकाम या प्रकारच्या क्षेत्रिय कामासाठी नेमणूक करावयाची आहेत. जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांची नेमणूक कंत्राटी पध्दतीने सात ते आठ महिन्यासाठी करावयाची आहेत. सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचा-यांची सेवा उर्ध्व पेनगंगा प्रकल्प मंडळ, नांदेड यांचे अधिनस्तव कामासाठी राहील. सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचा-यांना पदा संबंधीत कामाचे पुरेसा अनुभव असणे आवश्यक आहे. ईच्छुक अर्जदारांनी विहीत नमुन्यातील अर्ज अधीक्षक अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प मंडळ नांदेड यांच्याकडे दिनांक 10/01/2017 (सायंकाळी 5.00 वाजेपर्यत) प्राप्त होईल याप्रमाणे पोस्टाव्दारे सादर करावीत किंवा प्रत्यक्ष द्यावीत. अर्जाचे पाकीटावर "सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांच्या कंत्राटी पध्दतीवर नेमणूक करण्याबाबत" असे स्पष्ट लिहुन ज्या पदासाठी अर्ज सादर केला आहे त्या पदाचे नांव लिहण्यांत यावे. नियोजीत दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यांत येणार नाही. सदर नेमणूका समितीच्या मुलाखतीव्दारे करण्यांत येतील. सदर नेमणूकांचे आदेश हे शासनाच्या अंतीम मान्यतेनंतरच निर्गमीत करण्यांत येतील.

## कंत्राटी पध्दतीवर भरावयाचा पदांचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ. क्र. | संवर्ग | मंजुर पदे | रिक्त पदांची संख्या | कंत्राटी पद्धतीवर भरावयाची पदे | विवक्षित कामाचा तपशिल | जलसंपदा विभागातुन खालील पदावरुन सेवानिवृत्त झालेले अधिकारी / कर्मचारी सदर पदांकरीता अर्ज करण्यास पात्र आहे. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| (1) | कनिष्ठ अभियंता | 103 | 55 | 42 | क्षेत्रिय स्तरावरील बांधकामाधीन प्रकल्पांची कामे | सेवानिवृत्त क.अ./शा.अ./उपविअ |
| (2) | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | 64 | 46 | 02 | क्षेत्रिय स्तरावरील बांधकामाधीन प्रकल्पांची कामे | सेवानिवृत्त क.अ./स्था.अभि.सहा |
| (3) | वरिष्ठ लिपीक | 41 | 10 | 01 | मंडळ / विभागीय कार्यालयातील आस्थापना विषयक संबंधातील प्रलंबित व कार्यालयीन कामे. | सेवानिवृत्त अधीक्षक / प्रथम लिपीक |
| (4) | लिपीक व टंकलेखक | 90 | 37 | 04 | मंडळ / विभागीय कार्यालयातील आस्थापना विषयक संबंधातील प्रलंबित व कार्यालयीन कामे. | सेवानिवृत्त वरिष्ठ लिपीक |
| (5) | वाहन चालक | 21 | 17 | 01 | विभागीय कार्यालयांतर्गत कार्यन्वीत क्षेत्रिय कामाची पहाणी करण्यास्तव. | सेवानिवृत्त वाहन चालक |
| (6) | शिपाई | 57 | 27 | 02 | मंडळ व विभागीय कार्यालयातील कामकाज | सेवा निवृत्त शिपाई / चोकीदार |
| (7) | चोकीदार | 22 | 07 | 01 | मंडळ व विभागीय कार्यालयातील कामकाज | सेवा निवृत्त शिपाई / चोकीदार |

सदर नेमणूकीकरीता लागु असलेल्या अटी व शर्ती तसेच अर्जाचा नमुना हा महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाच्या ई-जलसेवा या वेबसाईट **https://wrd.maharashtra.gov.in** चे मुखपृष्ठावर उपलब्ध आहे. तसेच हा अर्ज व अटी / शर्ती कार्यकारी अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्र.4 आ.बाळापूर / उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्र.5 हदगांव / उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्र. 6 व 8 चैतन्यनगर नांदेड .या कार्यालयात संबंधीत उपकार्यकारी अभियंता यांचेकडे उपलब्ध आहे.

| अ.क्र. | कार्यालयाचे नांव व पत्ता | दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| (1) | कार्यकारी अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्र.4 आ.बाळापूर ता.कळमनूरी जि.हिंगोली. | 02455/242738 |
| (2) | कार्यकारी अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्र. 5 हदगांव जि.नांदेड | 02468/222308 |
| (3) | कार्यकारी अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्र.6 नांदेड जि.नांदेड | 02462/261447 |
| (4) | कार्यकारी अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्र.8 नांदेड जि.नांदेड | 02462/260401 |

**सदर नेमणूका या खालील सर्वसाधारण शर्ती व अटीच्या अधिन राहतील.**

1) करारपध्दतीवर नेमणूकी करीता अर्ज करते वेळी सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांचे वय दिनांक 01/01/2017 रोजी 60 वर्षेपेक्षा अधिक नसावे.व वर्ग 4 कर्मचारी यांचे वय दि.1.1.2017 रोजी 62 पेक्षा अधिक नसावे.

2) अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांनी ज्या पदासाठी अर्ज केले आहे. त्या पदाचा किमान तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

3) अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचा-या विरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रकरण नसावी याबाबत अर्जदारांनी ज्या कार्यालयातुन सेवानिवृत्त झाले आहे, त्या संबंधीत कार्यालयाकडुन तसे प्रमाणपत्र घेण्यांत यावे.

4) अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांची शारीरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याबाबत शासकीय वैद्यकीय अधिका-याचे मुळ प्रमाणपत्र द्यावे.

5) अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचा-यांची शेवटच्या पाच वर्षेच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी संबंधीत कार्यालयाकडुन प्रमाणीत करुन तसे प्रमाणपत्र सादर करावे, तसेच प्रशस्तीपत्र / नैपुण्यपूर्वक काम केले असल्यास तसे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडण्यांत यावे.

6) करारपध्दतीने नियुक्ती देण्यांत आल्यामुळे संबंधीतास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत किंवा सामावून घेण्याबाबत वा नियमित सेवेचा इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार नसेल याबाबत अर्जदाराने रु.100/- च्या स्टॅम्पवर बंधपत्र देण्यांत यावे.

7) नियुक्त अर्जदाराला त्यांनी विहीत कार्यपालन केल्यामुळे शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2715/प्र.क्र.100/11 दि.08/01/2016 मधील अटी व शर्तीप्रमाणे त्यांना सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेल्या एकुण वेतनातुन (मुळ वेतन व महागाई भत्ता धरुन त्यांना आता मिळत असलेले एकुण निवृत्ती वेतन) (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीसह) वजा केल्यानंतर येणारी उर्वरीत शिल्लक रक्कम मासिक परिश्रमिक म्हणुन त्यांना अनुज्ञेय राहील त्याची कमाल मर्यादा रु. रु.40,000/- पर्यंत मर्यादीत राहील.

8) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीच्या वेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

9) नियुक्ती प्राधिकारी (अधीक्षक अभियंता) यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

10) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमून दिलेले काम समाधानकारक नसल्यास कोणतेही सबळ कारण न देता त्यांची सेवा समाप्त करण्यांत येईल.

11) क्षेत्रिय स्तरावर करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास सेवाकाळामध्ये काही नैसर्गीक अपघात व काही आजार उद्भवल्यास कार्यालय / शासन बाधील राहणार नाही.

12) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमून दिलेली कामे पूर्ण करण्याची जबाबदारी सबधीत व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र / हमीपत्र त्यांच्याकडुन घेण्यांत येईल.

13) अर्ज करतेवेळी सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांचे ( PPO) निवृत्तीवेतन मंजुरीचे महालेखापाल कार्यालयाचे आवश्यक दस्तऐवज सादर करावेत.

14) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदाराने नियुक्तीच्या ठिकाणी नियुक्ती आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासुन 15 दिवसाचे आत रुजु होणे बंधनकारक राहील अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपुष्ठात येईल.

15) सदर नेमणूक सात ते आठ महिन्यापेक्षा वाढविण्याची आवश्यकता भासल्यास नियुक्ती अधिकारी तसा निर्णय घेऊ शकतात.

16) मुलाखतीकरीता पात्र उमेदवारांना पत्र ईमेलव्दारे पाठविण्यांत येईल व भ्रमणध्वनीवर लघुसंदेशाव्दारे कळविण्यांत येईल. यास्तव अर्जदारांनी आपल्या वैयक्तीक माहितीत त्यांचा ईमेल पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक देणे बंधनकारक आहे. तसेच मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी अधीक्षक अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प मंडळ नांदेड व कार्यकारी अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्र.4 आ.बाळापूर / उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्र.5 हदगांव / उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्र. 6 व 8 चैतन्यनगर नांदेड .यांचे सुचना फलकावर दिनांक 09/12/2016 रोजी प्रसिध्द करण्यांत येईल. व अंतिम निवड झालेल्या अर्जदारांची यादी वरील कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यांत येईल तसेच वेबसाईटवर प्रसिध्द करण्यांत येईल. तसेच अंतीम निवड झालेल्या अर्जदारांना वैयक्तीक ईमेलवर कळविण्यांत येईल.

उपरोक्त 01 ते 14 अटी व शर्ती मला मान्य आहेत ह्याबाबतचे अर्जदाराने रु.100/- च्या स्टॅम्पपेपरवर बंधपत्र देणे बंधनकारक राहील.

सदर नियुक्ती क्षेत्रिय स्थळावर आवश्यक बांधकामासाठी व कार्यालयीन कामासाठी करण्यांत येत असून त्यासाठी योग्य उमेदवार न भेटल्यास काही किंवा सर्व पदे रिक्त ठेवण्याचा अधिकार समितीस आहे.

अधीक्षक अभियंता,
उर्ध्व पेनगंगा प्रकल्प मंडळ,नांदेड

# विहित नमुन्यातील अर्ज
# पायाभूत सुविधा निर्मिती एमपॅनलमेंट

कनिष्ठ अभियंता/स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक/कालवा निरिक्षक / दप्तर कारकुन/ मोजणीदार या पदासाठी जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा विविध कामाकरीता करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबतचा अर्ज

प्रति,

मा.अधीक्षक अभियंता
उर्ध्व पेनगंगा प्रकल्प मंडळ,
सिंचन भवन, नांदेड-430605

उमेदवाराने अलिकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे

**अर्ज केलेल्या पदाचे नाव**--------------------------------------------

1 अर्जदाराचे नाव -

2 कायमचा पत्ता -

3 दुरध्वनी क्रमांक /भ्रमणध्वीसह (अनिवार्य) -

4 ई-मेल (अनिवार्य) -

5 सध्याचा पत्ता -

6 जन्मतारीख -

7 राष्ट्रीयत्व -

8 प्रवर्ग -

9 लिंग पुरुष/ महिला

10 अवगत भाषा -

11 शैक्षणिक माहिती -

| अ.क्र. | परिक्षा | वर्ष | विषय | शाळा/कॉलेजचे नाव | बोर्ड/ विद्यापिठ | मिळालेल्या गुणाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | |
| 2 | | | | | | |
| 3 | | | | | | |

12 इतर शैक्षणीक माहिती (संगणक इत्यादी)-

| अ.क्र. | अभ्यासक्रम | वर्ष | संस्थेचे (प्रायोजक)नांव | मिळालेल्या गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 1 | | | | |
| 2 | | | | |
| 3 | | | | |

13 अनुभव -

| अ.क्र. | हुद्दा व वेतन | कार्यालयाचे नाव व पत्ता | कालावधी | कामाचा अनुभव (विस्तृत स्वरुपात) |
|---|---|---|---|---|
| 1 | | | | |
| 2 | | | | |
| 3 | | | | |

14 :- सेवानिवृत्तीचा दिनांक

15 :- या मंडळा अंतर्गत ज्या ठिकाणी काम करण्याची ईच्छा आहे असे प्राधान्याचे ठिकाण अथवा कोठेही काम करण्यास तयार असल्यास तेस स्पष्टपणे नमुद करावे.

16 :- सद्य:स्थितीत कुठे काम करीत असल्यास तपशिल-

मला पुर्णपणे माहिती आहे की, पायाभुत सुविधा निर्मिती एमपॅनलमेंट द्वारे प्रकल्पाचे क्षेत्रिय व कार्यालयीन कामाकरीता सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी कनिष्ठ अभियंता / स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक / वरिष्ठ लिपीक / लिपीक-टंकलेख / शिपाई / चौकीदार या पदाकरीता उमेदवारांची नियुक्ती करण्यात येणार आहे.सदर पदे प्रकल्पाचे क्षेत्रिय कार्यालयीन कामासाठी 6 ते 8 महिन्याकरीता आहे व कामाचे व्याप्ती प्रमाणे कमी/अधिक करण्यात येतील. कामाच्या निकडीनुसार जिल्हयातील कोणत्याही तालुक्यात माझी काम करण्याची तयारी आहे.

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, माझे माहिती प्रमाणे वर दिलेल्या तपशिल सत्य व अचुक आहे. यामध्ये काही चुकीची माहिती आढळल्यास माझी निवड कोणत्याही क्षणी पुर्न सुचने शिवाय रद्द होईल व मी शिक्षेस पात्र ठरेल याची मला पुर्ण जाणिव आहे.

**अर्जदाराची सही**

**ठिकाण-**

**दिनांक-**